सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड इमारत, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४.
Email Id: contact-secretary@mpsc.gov.in Website: https://mpsc.gov.in, https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc ०२२-६९३८५९००

क्रमांक : एमआयएस-०६२५/प्र.क्र.१४३/२०२६/जाहिरात **दिनांक :- ०६ नोव्हेंबर,२०२६**

-: परीक्षा योजना शुद्धिपत्रक :-

विषय :- महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त परीक्षेची परीक्षा योजना

संदर्भ :- १) शासन निर्णय , सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : प्रानिमं-१२२४/प्र.क्र.७०/सेवा-४, (का.१३-अ), दिनांक ०५ मे, २०२६

२) महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त परीक्षेची परीक्षा योजना, दिनांक २० मे, २०२६

३) महाराष्ट्र गट-क संयुक्त पूर्व परीक्षा २०२६ संदर्भात आयोगाचे दिनांक ०१ ऑगस्ट, २०२६ रोजीचे प्रसिद्धीपत्रक

आयोगाच्या संकेतस्थळावर महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त परीक्षेकरीता परीक्षा योजना दिनांक २० मे, २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर परीक्षा योजनेतील परिच्छेद १.१ मध्ये प्रस्तुत परीक्षेतून भरावयाचे **०६ संवर्ग** दर्शविण्यात आले आहेत.

२. दरम्यान शासन निर्णय दिनांक ०५ मे, २०२६ मध्ये दर्शविलेल्या गट-क मधील ज्या संवर्गाकरीता आयोगाकडे मागणीपत्र प्राप्त झाले आहे अशा **२१ संवर्गाचा** या शुद्धीपत्रकान्वये महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त परीक्षेकरीता परीक्षा योजनेमध्ये समावेश करण्यात येत असून त्यांची यादी सोबतच्या परिशिष्ट क्रमांक १ मध्ये दर्शविण्यात आली आहे.

तसेच शासन निर्णय दिनांक ०५ मे, २०२६ मध्ये नमूद गट-क संवर्गापैकी समान शैक्षणिक अर्हता आवश्यक असलेल्या संवर्गाकरीता भविष्यात पूर्व परीक्षेच्या निकालापर्यंत मागणीपत्र प्राप्त झाल्यास, सदर संवर्ग प्रस्तुत परीक्षा योजनेमध्ये अंतर्भूत असल्याचे समजण्यात येईल.

३. महाराष्ट्र गट-क सेवेतील विद्यमान संवर्ग आणि वरीलप्रमाणे नव्याने समाविष्ट झालेल्या/होणाऱ्या संवर्गांकरीता वयोमर्यादा संदर्भाधीन दिनांक २० मे, २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या योजनेतील परिच्छेद ३.२ अनुसार राहील. तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी प्रसिद्ध होणाऱ्या शासन निर्णयानुसार होणारे बदल लागू राहतील.

४. महाराष्ट्र गट-क सेवेमध्ये विद्यमान तसेच नव्याने समाविष्ट झालेल्या संवर्गांकरीता संयुक्त पूर्व परीक्षा घेण्यात येईल.

५. दिनांक २० मे २०२६ च्या परीक्षा योजनेतील पूर्व परीक्षेच्या निकालासंदर्भातील परि. ६.४.१ व ६.४.२ या शुद्धीपत्रकान्वये सुधारणा करण्यात येत असून तो पुढीलप्रमाणे वाचण्यात यावा.

६.४.१ गट-क सेवेतील विविध संवर्गांसाठी संयुक्त पूर्व परीक्षेकरीता अर्जामध्ये दिलेला विकल्प तसेच, भरावयाच्या अराखीव व आरक्षित एकूण पदसंख्येच्या आधारे, मुख्य परीक्षेसाठी पात्र करावयाच्या उमेदवारांची संख्या निश्चित करुन, सामाईक पूर्व परीक्षेमधील उमेदवारांच्या गुणांच्या आधारे गट-क सेवेतील सामान्य शैक्षणिक अर्हता असणाऱ्या संवर्गाकरीता (विशिष्ट शैक्षणिक अर्हता आवश्यक असलेले संवर्ग वगळता) एकत्रित निकाल जाहीर करण्यात येईल.

६.४.२ विशिष्ट शैक्षणिक अर्हता आवश्यक असलेल्या संवर्गांसाठी दिलेला विकल्प तसेच भरावयाच्या अराखीव व आरक्षीत एकूण पदसंख्येच्या आधारे मुख्य परीक्षेसाठी पात्र करावयाच्या उमेदवारांची संख्या निश्चित करुन, संयुक्त पूर्व परीक्षेमधील उमेदवारांच्या गुणांच्या आधारे सदर संवर्गाकरीता स्वतंत्र निकाल जाहिर करण्यात येईल.

६. दिनांक २० मे २०२६ च्या परीक्षा योजनेतील मुख्य परीक्षेच्या स्वरुपासंदर्भातील परि. ६.५.१ मध्ये या शुद्धीपत्रकान्वये सुधारणा करण्यात येत असून तो पुढीलप्रमाणे वाचण्यात यावा.

६.५.१.१ सामान्य शैक्षणिक अर्हता आवश्यक असलेल्या गट-क सेवेतील प्रशासकीय संवर्गांच्या मुख्य परीक्षेकरीता विहित करण्यात आलेल्या परीक्षा योजना व अभ्यासक्रमानुसार संयुक्त मुख्य परीक्षेचे आयोजन करण्यात येईल.

६.५.१.२ विशिष्ट शैक्षणिक अर्हता आवश्यक असलेल्या तसेच नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या संवर्गासाठी स्वतंत्र मुख्य परीक्षेचे आयोजन करण्यात येईल.

७. दिनांक २० मे २०२६ च्या परीक्षा योजनेतील मुख्य परीक्षेसंदर्भातील परिच्छेद २.१३ आणि परिच्छेद ६.२ तसेच निकाल प्रक्रियेसंदर्भातील परिच्छेद ७ च्या अनुषंगाने आवश्यक शुद्धिपत्रक स्वतंत्रपणे प्रसिद्ध करण्यात येईल.

८. ज्या एकाहून अधिक संवर्गाची एकच सामाईक मुख्य परीक्षा घेण्यात येईल, अशा परीक्षांमधील उमेदवारांकडून आवश्यकतेनुसार संवर्ग/सेवेचा विकल्प/पसंतीक्रम घेण्यात येईल.

९. विद्यमान परीक्षा योजनेतील प्रतिक्षा यादी संदर्भात परिच्छेद ७.४.६ मधील "लिपिक-टंकलेखक संवर्गाकरीता" शब्द समुहाऐवजी "लिपिक-टंकलेखक सह विविध नियुक्ती प्राधिकारी असलेल्या संवर्गांकरीता" असे वाचण्यात यावे.

१०. महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त परीक्षेकरीता दिनांक २० मे, २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या परीक्षा योजनेतील उपरोल्लेखित तरतुदींव्यितिरक्त इतर अटी व शर्तींमध्ये बदल झाल्यास वेळो-वेळी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

ठिकाण : नवी मुंबई

उप सचिव (जाहिरात)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

परिशिष्ट - १

महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त परीक्षा मधील विविध संवर्गाकरीता आवश्यक अर्हता/शैक्षणिक अर्हता

अ.क्र.	संवर्ग	शैक्षणिक अर्हता
१	उद्योग निरीक्षक, गट-क	(१) सांविधिक विद्यापीठाची, अभियांत्रिकी मधील (स्थापत्य अभियांत्रिकी तसेच स्थापत्य अभियांत्रिकी मधील विषयांच्या गटांशी संलग्न असलेल्या वास्तुविद्या, नगररचना इत्यादी विषयांव्यतिरिक्त) किंवा तंत्रज्ञानामधील किमान पदविका, किंवा (२) विज्ञान शाखेतील सांविधिक विद्यापीठाची पदवी.
२	तांत्रिक सहायक, गट-क	मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने पदवीस समतुल्य म्हणून मान्य केलेली अर्हता.
३	सहायक मोटार वाहन निरीक्षक, गट-क	**(अ) शैक्षणिक अर्हता :-** **(१)** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (एस.एस.सी.) किंवा महाराष्ट्र शासनाने एस.एस.सी. च्या समतुल्य म्हणून घोषित केलेली अर्हता, आणि **(२)** माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर स्वयंचल अभियांत्रिकी (Automobile Engineering) वा यंत्र अभियांत्रिकी (Mechanical Engineering) विषयातील किमान ३ वर्षाची पदविका वा केंद्र वा राज्य शासनाने त्यास समकक्ष म्हणून घोषित केलेली अर्हता. **(३)** स्वयंचल अभियांत्रिकी (Automobile Engineering) वा यंत्र अभियांत्रिकी (Mechanical Engineering) विषयातील मान्यता प्राप्त विदयापीठाची पदवी किंवा त्यापेक्षा अत्युच्च अर्हता धारण केलेले वा केंद्र वा राज्य शासनाने त्यास समकक्ष म्हणून घोषित केलेल्या अर्हता धारण केलेले उमेदवार देखील पात्र राहतील. **(४)** शासन पत्र, गृह विभाग, क्रमांक: एमव्हीडी-१२१६/प्र.क्र.-३०१/परि-३, दिनांक २३ जानेवारी, २०१७ खालील अर्हता समतुल्य शैक्षणिक अर्हता म्हणून स्वीकारार्ह आहेत :- (१) डिप्लोमा इन प्रॉडक्शन टेक्नॉलॉजी, (२) डिप्लोमा इन प्रॉडक्शन इंजिनिअरिंग (३) डिप्लोमा इन मशिन टूल्स मेन्टेनन्स, (४) डिप्लोमा इन फॅब्रिकेशन टेक्नॉलॉजी (५) डिप्लोमा इन फॅब्रिकेशन अँड इरेक्शन इंजिनिअरिंग, (६) डिप्लोमा इन प्लॅन्ट इंजिनिअरिंग, (७) डिप्लोमा इन मेटॅलर्जी, (८) बॅचलर डिग्री इन मेकॅनिकल इंजिनिअरींग, (९) बॅचलर डिग्री इन ऑटोमोबाईल इंजिनिअरींग, (१०) बॅचलर डिग्री इन प्रॉडक्शन इंजिनिअरींग, (११) बॅचलर डिग्री इन इंडस्ट्रिअल इंजिनिअरींग, **(५)** शासन पत्र, गृह विभाग, क्रमांक: एमव्हीडी-१२१६/प्र.क्र.-३०१/परि-३, दिनांक १५ फेब्रुवारी, २०१७ अन्वये डिप्लोमा इन मेकॅट्रॉनिक्स इंजिनिअरिंग समतुल्य शैक्षणिक अर्हता म्हणून स्वीकारार्ह आहे.. **(६)** शासन पत्र, गृह विभाग, क्रमांक: एमव्हीडी-१२१६/प्र.क्र.-३०१/परि-३, दिनांक १६ फेब्रुवारी, २०१७ अन्वये डिप्लोमा इन पॅकेजिंग टेक्नॉलॉजी समतुल्य शैक्षणिक अर्हता म्हणून स्वीकारार्ह आहे.. **(७)** शासन पत्र, गृह विभाग, क्रमांक: एमव्हीडी-१२१६/प्र.क्र.-३०१/परि-३, दिनांक १८ फेब्रुवारी, २०१७ अन्वये ४ Years Theoretical and Practical Training as an Artificer Apprentice टेक्नॉलॉजी समतुल्य शैक्षणिक अर्हता म्हणून स्वीकारार्ह आहे. **(८)** शासन पत्र, परिवहन विभाग, क्रमांक: एमव्हीडी-0225/प्र.क्र. 23/परि-3, दिनांक 24 जुलै, 2026 रोजीच्या पत्रान्वये खाली नमूद अर्हता प्रस्तुत संवर्गाकरीता समतुल्य शैक्षणिक अर्हता म्हणून ग्राह्य समजण्याबाबत अभिप्राय प्राप्त झाले आहेत :- (1) B-Tech in Mechatronics Engineering (2) B.E. Mechanical (Sandwich) (3) Degree in Metallurgy (4) B.E in Industrial and Production Engineering (5) B.E. (Production Sandwich) (6) B.Tech (Mechanical and Smart Manufacturing) (7) Diploma in Manufacturing Automation (8) ४ Year Advanced Diploma in Tool and Die Making **(ब) अनुभव :-** (१) स्वयंचल अभियांत्रिकी वा यंत्र अभियांत्रिकी मधील पदविका/पदवी/अत्युच्च अर्हता अथवा वरीलप्रमाणे समकक्ष अर्हता धारण केल्यानंतर मुख्य परीक्षेकरीता अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकास हलकी मोटार वाहने, जड मालवाहू वाहने व जड प्रवासी वाहने यांचे दुरुस्ती व देखभाल करण्याचा पूर्ण वेळ कर्मचारी म्हणून केंद्र अथवा राज्य शासनाच्या विभागामध्ये वा अंगीकृत व्यवसायांचे अखत्यारीतील यंत्रशाळांमध्ये घेतलेला अथवा शासन वेळोवेळी निर्देशित करेल अशा संस्थांमध्ये घेतलेला किमान एक वर्ष कालावधीचा अनुभव आवश्यक. (२) अनुभवाच्या प्रयोजनार्थ प्रशिक्षणार्थी अथवा अॅप्रेंटिस म्हणून वरील ठिकाणी घेतलेला अनुभव गृहित धरला जाऊ शकेल. (३) मुख्य परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकास वर नमूद केल्याप्रमाणे किमान एक वर्ष कालावधीचा पूर्ण वेळ कर्मचारी म्हणून अनुभव नसेल त्यांनी नियुक्तीनंतर परिविक्षाधीन कालावधीमध्ये शासनाच्या विभागात अथवा अंगीकृत

<table>
<tr><td></td><td>सहायक मोटार वाहन निरीक्षक, गट-क</td><td>व्यवसायामध्ये अथवा शासन वेळोवेळी निर्देशित करेल अशा संस्थांमध्ये किमान १ वर्ष कालावधीचा अनुभव घेणे बंधनकारक राहील.
(क) वैध अनुज्ञप्ती (License) :-
(१) मुख्य परीक्षेकरीता अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वैध असणारी गिअर्स असलेली मोटार सायकल, हलके मोटार वाहन आणि परिवहन वाहन (जड मालवाहू वाहन आणि जड प्रवासी वाहन) या संवर्गासाठी सक्षम प्राधिका-याने दिलेली वैध अनुज्ञप्ती (Licence) आवश्यक.
(२) अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वर नमूद केल्याप्रमाणे जड माल वाहतूक वाहन किंवा जड प्रवासी वाहतूक वाहन यापैकी एखादी किंवा दोन्ही वाहने चालविण्याची अनुज्ञप्ती (Licence) नसेल तर अशा उमेदवारास अशी अनुज्ञप्ती, नियुक्ती नंतरच्या दोन वर्षाच्या परिवीक्षा कालावधीमध्ये प्राप्त करणे बंधनकारक असेल.
(३) परिविक्षा कालावधीमध्ये अशी अनुज्ञप्ती प्राप्त न करणा-या उमेदवारास सेवेतून कमी करण्यात येईल.
(४) वाहन चालविण्याची अनुज्ञप्ती वेळोवेळी नूतनीकरण केली असली पाहिजे आणि
(ड) शारीरिक पात्रता:-
<table>
<tr><th>पुरुष</th><th>महिला</th></tr>
<tr><td>(१) उंची - किमान १६३ सें. मी. (अनवाणी) (कमीत कमी)
(२)छाती - किमान ७९ से.मी. प्रसारणाशिवाय व किमान ५ से.मी. प्रसरण.</td><td>(१) उंची - किमान १५५ सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी)
(२) वजन- किमान ४५ कि.ग्रॅ.</td></tr>
<tr><td colspan="2">जे रंगांध नसून, ज्यांची दृष्टी चष्म्यासह वा शिवाय चांगली आहे.</td></tr>
</table></td></tr>
<tr><td>४</td><td>कर सहायक, गट-क</td><td>मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने पदवीस समतुल्य म्हणून मान्य केलेली अर्हता.
टंकलेखन अर्हता :- दिनांक २५ जून, २०२६ रोजी प्रसिद्ध जाहिराती मधील परिच्छेद ३.३.५ नुसार राहील</td></tr>
<tr><td>५</td><td>लिपिक-टंकलेखक, गट-क</td><td>मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने पदवीस समतुल्य म्हणून मान्य केलेली अर्हता.
टंकलेखन अर्हता :- दिनांक २५ जून, २०२६ रोजी प्रसिद्ध जाहिराती मधील परिच्छेद ३.३.५ नुसार राहील</td></tr>
<tr><td>६</td><td>ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) गट-क</td><td>सांविधिक विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील पदवी</td></tr>
<tr><td>७</td><td>सहायक अधीक्षक, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, गट-क</td><td>कोणत्याही शाखेतील पदवी</td></tr>
<tr><td>८</td><td>विविध विभागातील वरिष्ठ लिपिक, गट-क</td><td>कोणत्याही शाखेतील पदवी</td></tr>
<tr><td>९</td><td>कनिष्ठ कौशल्य, रोजगार व मार्गदर्शन अधिकारी</td><td>कोणत्याही शाखेतील पदवी</td></tr>
<tr><td>१०</td><td>सहायक मत्स्य व्यवसाय विकास अधिकारी</td><td>मत्स्यविज्ञान विषयातील किमान द्वितीय श्रेणीतील पदवी (B.F.Sc.) धारण करणे आवश्यक</td></tr>
<tr><td>११</td><td>कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी.</td><td>मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने पदवीस समतुल्य म्हणून मान्य केलेली अर्हता</td></tr>
<tr><td>१२</td><td>उपलेखापाल/ मुख्य लिपिक, आदिवासी विकास विभाग</td><td>कोणत्याही शाखेतील पदवी</td></tr>
<tr><td>१३</td><td>आदिवासी विकास निरीक्षक</td><td>कोणत्याही शाखेतील पदवी</td></tr>
<tr><td>१४</td><td>अन्वेषक, अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, मुंबई</td><td>कोणत्याही शाखेतील पदवी</td></tr>
<tr><td>१५</td><td>दूरध्वनीचालक, मा. राज्यपालांचे सचिव कार्यालय, मुंबई</td><td>कोणत्याही शाखेतील पदवी</td></tr>
<tr><td>१६</td><td>पुरवठा निरीक्षक</td><td>कोणत्याही शाखेतील पदवी</td></tr>
<tr><td>१७</td><td>सहायक भांडारपाल, सार्वजनिक बांधकाम विभाग</td><td>कोणत्याही विद्याशाखेतील वैधानिक विद्यापीठाची पदवी किंवा शासनाने त्यास समकक्ष म्हणून मान्य केलेली अर्हता</td></tr>
</table>

अ.क्र.	संवर्ग	शैक्षणिक अर्हता
१८	पशुधन पर्यवेक्षक, गट-क	शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १०ऑगस्ट, २०२६ अन्वये – (१) शासकीय मान्यताप्राप्त संस्थेतून दोन वर्षांचा पशुधन व्यवस्थापन आणि दुग्ध उत्पादन या विषयातील पदविका अभ्यासक्रम, **किंवा** (२) शासकीय मान्यताप्राप्त संस्थेतून पशुवैद्यकशास्त्रातील पदवी धारण करणे आवश्यक.
१९	स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, सार्वजनिक बांधकाम विभाग,	उमेदवाराने स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदवी किंवा पदविका किंवा शासनाने त्याच्याशी समकक्ष म्हणून जाहीर केलेली अन्य कोणतीही पात्रता
२०	गणित तथा चित्रकला निदेशक, गट-क	शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १०ऑगस्ट, २०२६ अन्वये – शासकीय मान्यताप्राप्त संस्थेतून यांत्रिकी अभियांत्रिकीमधील डिप्लोमा **किंवा** पदवी **किंवा** त्यास समकक्ष कोणतीही पदवी
२१	सहायक भांडारपाल	शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १०ऑगस्ट, २०२६ अन्वये – शासकीय मान्यताप्राप्त संस्थेतून अभियांत्रिकी (कोणतीही शाखा) मधील पदविका किंवा पदवी किंवा त्यास समकक्ष कोणतीही अर्हता
२२	भांडारपाल	शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १०ऑगस्ट, २०२६ अन्वये – शासकीय मान्यताप्राप्त संस्थेतून अभियांत्रिकी (कोणतीही शाखा) मधील पदविका किंवा पदवी किंवा त्यास समकक्ष कोणतीही अर्हता
२३	शिल्पनिदेशक, गट-क	शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १०ऑगस्ट, २०२६ अन्वये – (१) राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रमाणपत्र (National Apprenticeship Certificate) **किंवा** (२) राष्ट्रीय व्यापार प्रमाणपत्र (National Trade Certificate) आणि हस्तकला प्रशिक्षक प्रशिक्षण योजना (Craft Instructor Training Scheme) यांचे प्रमाणपत्र **किंवा** (३) यांत्रिक / विद्युत / इलेक्ट्रॉनिक्स या विषयांमध्ये पदविका (Diploma) किंवा पदवी (Degree) अर्हता.
२४	अधिपरिचारिका	(१) मान्यताप्राप्त संस्थेतून 'जनरल नर्सिंग अँड मिडवाइफरी' (GNM) मधील पदविका (डिप्लोमा) **किंवा** (२) बॅचलर ऑफ सायन्स (नर्सिंग) **किंवा** (३) पोस्ट बेसिक बॅचलर ऑफ सायन्स(नर्सिंग) ची पदवी (४)उमेदवाराने महाराष्ट्र परिचर्या परिषद अधिनियम, १९६६ व भारतीय परिचर्या परिषद अधिनियम, १९४७ (१९४७ चा ४८) अंतर्गत त्याने धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेची महाराष्ट्र परिचर्या परिषद, मुंबई येथे नावनोंदणी करणे आवश्यक. (५) यानुसार नोंदणी केली नसेल तर पदासाठी अर्ज करण्यापूर्वी नोंदणी करुन घेणे आवश्यक राहील. (६) उक्त अधिनियमांत विनिर्दिष्ट केलेला कालावधी पूर्ण होण्यापूर्वी वेळोवेळी अशा नोंदणीचे नूतनीकरण करणे आवश्यक असेल. (७) भारतीय परिचर्या परिषदेच्या मानकानुसार दुरस्थ शिक्षणाद्वारे किंवा मुक्त विद्यापीठातून उमेदवाराने प्राप्त केलेली शैक्षणिक अर्हता ग्राह्य धरली जाणार नाही.
२५	कनिष्ठ रसायनी, गट-क	शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १०ऑगस्ट, २०२६ अन्वये – रसायनशास्त्र किंवा कृषी रसायनशास्त्र यांमधील पदवी, किंवा शासनाने त्यास समकक्ष म्हणून घोषित केलेली इतर कोणतीही अर्हता.
२६	सहाय्यक कृषी अधिकारी	कृषी विषयामधील किमान पदविका **किंवा** कृषी पदवी **किंवा** कृषी विषयातील यापेक्षा उच्च शैक्षणिक अर्हता
२७	स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक ,जलसंपदा विभाग	शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १०ऑगस्ट, २०२६ अन्वये – स्थापत्य अभियांत्रिकी शाखेतील पदवीका किंवा पदवी धारण केलेली व्यक्ती